बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३२३ ■ बुधवार २६ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

Post Regd.No./DHL/53/24-26


PREMIUM QUALITY FOOD IN DHULE
* Dosas * Sandwiches * Pav Bhaji * Pulao * Frankie
* Pizza * Fries * Chopsuey / Noodles * Momos
* Soup * Punjabi / Chinese / Continental * Starters
* Sizzler * Tandoor Starters * Chaap * Thali
Main Course * Juices * Falooda / Milkshakes / Dessert
JAIN FOOD AVAILABLE FREE HOME DELIVERY
SPACE FOR KITTY / BIRTHDAY PARTY
B'Live Restaurant
Below Card House, Lane No.5, Near Sonya Maruti, Dhule
9423928900 / 9307868768
Also available on zomato SWIGGY

## केंद्र सरकार पाच शहरांना पस्तीस रुपये किलोने कांदा विकणार नाशिकची कांदा एक्सप्रेस दिल्लीकडे, शेतकरी आंदोलन तयारीत



**नाशिक, दि. २५ : कांद्याच्या वाढत्या दराला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने नाशिक येथील बफर स्टॉकमधील कांदा रेल्वेच्या विशेष रॅकद्वारे देशातील दिल्लीसह प्रमुख शहरांमध्ये पाठवणार आहे. कांदा एक्सप्रेसच्या माध्यमातून पाठवला जाणारा हा विशेष रॅक आज लासलगाव रेल्वे स्थानकातून रवाना करण्याचा प्रयत्न झाला. मिळालेल्या माहितीनुसार नाफेड व एनसीसीएफ या संस्थेच्या माध्यमातून खरेदी करण्यात आलेल्या एक लाख २१ हजार मेट्रीक टन, स्टॉक मधील ८४० मेट्रीक टन कांदा हा दिल्लीला पाठवला जाणार आहे.**

नाफेड आणि एन.सी. सी.एफ.या सारख्या संस्थांमार्फत किंमत स्थिरीकरण निधीअंतर्गत कांद्याची खरेदी केली जाते. तसेच दर वाढल्यास नियोजनबद्ध पद्धतीने बाजारात हा साठा उतरवत कांद्याचे भाव कमी केले जातात. दरम्यान, नाशिक जिल्ह्यातील बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांच्या कांदा मालाला सध्या तीन हजार पाचशे ते चार हजार रुपयांपर्यंत भाव मिळत असतांना नाफेड एन.सी.सी.एफ. ने खरेदी केलेल्या बफर स्टॉक मधील हा कांदा देशातील प्रमुख शहरांमध्ये उतरवल्यास त्याचा थेट फटका येथील कांदा भावावर होऊ शकतो, अशी भीती शेतकरी आणि व्यापाऱ्यांना आहे.

**शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा**

नाशिक जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये कांद्याला साडेतीन हजार ते चार हजार रुपये भाव मिळत असल्याने शेतकरी समाधानी होते. मात्र, केंद्र सरकार कांद्याचे भाव पाडण्याचे काम करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. नाफेड व एन.सी. सी.एफ.ने खरेदी केलेला कांदा आम्ही दिल्लीत जाऊ देणार नाही, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला होता. केंद्र सरकार ग्राहकहित बघते मग शेतकरी हित कधी बघणार, असा प्रश्न शेतकऱ्यांनी उपस्थित **(पान ४ वर)**

### पाटण्यात विद्यार्थ्यांचे आंदोलन पेटले

पाटणा, दि. २५ : बिहारची राजधानी पाटणा येथे विद्यार्थ्यांचे आंदोलन भडकले आहे. विद्यार्थ्यांनी मंगळवारी मुख्यमंत्र्यांच्या घराच्या दिशेने काढलेल्या मोर्चाने राजकीय वातावरण तापले. मोर्चाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. सत्तरावी बिहार लोकसेवा आयोगाची परीक्षा रद्द करावी, या मागणीसाठी मोठ्या संख्येने आंदोलक विद्यार्थी जमले होते. विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनीही आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. विद्यार्थी आक्रमक झाल्याने बिहारमधील राजकीय वातावरण तापले आहे.विद्यार्थी आंदोलकांनी प्रशासनाकडे मुख्यमंत्र्यांच्या भेटीची मागणी केली आहे. शिक्षण विभागाचे मुख्य सचिव **(पान ४ वर)**

## कै.मा.न्यायमूर्ती विजयराव कोतवाल व्याख्यानमालेचा स.न्यायालयाचे न्या.मा.श्री वराळे यांच्या हस्ते उद्घाटन



**धुळे, दि.२५- कै. एस. बी. उर्फ बाबासाहेब कोतवाल चॅरिटेबल ट्रस्ट, धुळे यांच्या वतीने आयोजित कै. मा. न्यायमूर्ती विजयराव कोतवाल व्याख्यानमाले चा उद्घाटन सोहळा धुळे येथील कुमाईन क्लब समोरील कोतवाल ट्रस्ट हॉलमध्ये उत्साहात शनिवार दि. २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी आठ वाजता संपन्न झाला. या कार्यक्रमास मा. सर्वोच्च न्यायालयाचे मा. न्यायमूर्ती मा. प्रसन्ना बी. वराळे साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. कार्यक्रम सुरू होण्याअगोदर कोतवाल कुटुंबातील चार पिढ्या यांच्या संदर्भातील सचित्र व अभ्यासपूर्ण माहितीची क्लिप मोठ्या पडद्यावर दाखवण्यात आली कार्यक्रमास उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती देखील उपस्थित होते.**

धुळे शहरातील जेलरोड येथे असलेल्या बाबासाहेब कोतवाल ट्रस्ट मध्ये शनिवार दि. २२ ऑगस्ट रोजी रात्री आठ वाजता सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. प्रसन्ना वराळे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत दीप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना हेमंत मदाने यांनी ट्रस्टच्या कार्याची माहिती दिली. उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती विजयराव कोतवाल हे जिल्हा न्यायालयातून उच्च न्यायालयात जाणारे महाराष्ट्राच्याग्रामीण भागातील पहिले न्यायाधीश होते,हे नमूद करून कोतवाल कुटुंब यांची चार पिढ्यातील धुळ्यातील योगदानाची माहिती दिली. भरकटलेल्या सोशल मीडियाच्या युगात माजी न्यायमूर्ती कै. विजयराव कोतवाल व्याख्यानमाले मार्फत कसे व्याख्यानाचे उपक्रम राबवले जातील याची थोडक्यात माहिती दिली.

ट्रस्टच्या वतीने कार्यक्रमास आलेले सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माननीय श्री.प्रसन्ना वराळे साहेब यांच्यासह मुंबई उच्च न्यायालयाचे सर्व न्यायमूर्ती,जिल्हाप्रमुख न्यायाधीश यांचा सत्कार शाल,श्रीफळ व पर्यावरणाला पूरक असा बुके देऊन कोतवाल ट्रस्टच्या ट्रस्टींच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास उच्च न्यायालयाचे माननीय श्री. न्यायमूर्ती एम.एस. कर्णिक, माननीय श्री. न्यायमूर्ती सारंग कोतवाल, माननीय न्यायमूर्ती श्री.नितीन बी. सूर्यवंशी, माननीय न्यायमूर्ती श्री.एस. जी.चपळगावकर (धुळे जिल्हा पालक न्यायमूर्ती), माननीय न्यायमूर्ती श्री.ए. बी. काडेठाणकर(धुळे जिल्हा पालक न्यायमूर्ती),माननीय न्यायमूर्ती श्री. शैलेश ब्रह्मे, माननीय न्यायमूर्ती श्री.अभय एस. वाघवसे, माननीय न्यायमूर्ती वैशाली जाधव, माननीय न्यायमूर्ती श्री.आबासाहेब डी. शिंदे, माननीय न्यायमूर्ती श्री.एस. जी. मेहरे तसेच धुळे जिल्ह्याच्या प्रमुख व सत्र न्यायाधीश मा. समृद्धी एस. भीष्म, मुंबई उच्च न्यायालयाच्या प्रबंधक न्यायाधीश शर्मा मॅडम,धुळे जिल्हा ग्राहक मंच अध्यक्ष न्यायाधीश देसाई मॅडम तसेच धुळे जिल्ह्यातील न्यायाधीश आवर्जून उपस्थित होते. मुंबई औरंगाबाद उच्च न्यायालयाचे सरकारी वकील,बार कौन्सिल ऑफ इंडियाचे सदस्य,धुळे जिल्ह्यातील जेष्ट विधीज्ञ यांच्यासह धुळे बार कौन्सिलचे वकील व चाहते उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. याप्रसंगी न्यायमूर्ती श्री एम एस कर्णिक साहेब यांनी आपल्या भाषणातून मुंबई उच्च न्यायालयात काम करताना त्यांच्या माजी न्यायमूर्ती विजयराव **(पान ४ वर)**

### धुळे एल.सी.बी.ला गुटखा का सापडत नाही?

## अन्न व औषध प्रशासनाने मोराणे जवळ दोन पिकअपसह एकसष्ट लाखांचा गुटखा पकडला

**धुळे, दि.२५- राज्यात प्रतिबंधित असलेल्या पानमसाला व सुगंधित तंबाखूची वाहतूक करणारी दोन पिकअप वाहने नागपूर सुरत महामार्गावरील मोराणे (धुळे) फाट्याजवळ पकडली. ६१ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी चार जणांविरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. विशेष म्हणजे धुळे एल.सी.बी.चा चार्ज घेतल्यानंतर धुळे जिल्ह्यात चमत्कार झाला आहे. पूर्वी दररोज गुटखा सापडत होता. पण आता तो पोलीसांनाही सापडत नाही, ही बाब विचार करण्यासारखी आहे.**

धुळे जिल्ह्यात गुटखा पकडायचाच नाही, अशी भूमीका एल.सी.बी.ची दिसते. काही छूटपूट केसेस वगळता ठोस कारवाई दिसत नाही. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने पोलिसांनी सोमवारी (ता.२४) मोराणे शिवारात दोन्ही पिक अप व्हॅनची तपासणी केली. घरांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित पानमसाला व सुगंधित तंबाखूचा साठा आढळला. पिकअप क्र.एमएच०४/जेके-६९७५ मधून विविध कंपन्यांचा प्रतिबंधित पानमसाला व सुगंधित तंबाखूचा सुमारे २५ लाख ६३ हजार ५०० रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. तसेच वाहनाची अंदाजे ३ लाख रुपये किंमत धरून एकूण २८ लाख ६३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. दुसऱ्या महिंद्रा पिकअप क्र. जीजे-२६/टी ४५३८ मधून २७ लाख ९१ हजार ५०० रुपयांचा पानमसाला व तंबाखूचा साठा जप्त कला. पिकअपसह ३२ लाख ९१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही वाहनांमधून एकूण ६१ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागाच्या अन्न सुरक्षा अधिकारी सुवर्णा देविदास महाजन यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार धुळे तालुका पोलीस ठाण्यात देव्या **(पान ४ वर)**

## ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर नंदुरबारात पोलीसांचे रूट मार्च

**नंदुरबार, दि.२५ (प्रतिनिधी) - ईद-ए-मिलादच्या अनुषंगाने नंदुरबार जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच समाजकंटक व गुन्हेगारांवर पोलिसांचा वचक राहावा, यासाठी मंगळवारी दि.२५ ऑगस्ट रोजी नंदुरबार जिल्हा पोलीस दलाच्या वतीने शहरात रुट मार्च काढण्यात आला.**



नंदुरबार शहर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक संदीप यांच्या मार्गदर्शनाखाली हा रुट मार्च काढण्यात आला. यावेळी पोलीस ठाण्याचे दुय्यम अधिकारी व पोलीस कर्मचारी, एस.आर. पी.एफ. तुकडी, आर.सी.पी., क्युआरटी पथक तसेच होमगार्डचे जवान असे एकूण ३१५ पोलीस अधिकारी व अंमलदार सहभागी झाले होते. शहरातील मच्छी बाजार, इलाही चौक, मोहल्ला, चिराग गल्ली, महात्मा ज्योतिबा फुले पुतळा, माळीवाडा आणि बागवान गल्ली या मार्गावरून रुट मार्च काढण्यात आला. ईद-ए-मिलादचा सण शांततेत आणि आनंदाच्या **(पान ४ वर)**

### गणेशोत्सवनिमित्त शांतता समितीची बैठक संपन्न

नंदुरबार, दि.२५- गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा-सुव्यवस्था, वाहतूक व्यवस्था आणि सामाजिक सलोखा राखण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या याहामोगी सभागृहात २४ ऑगस्ट रोजी शांतता समितीची बैठक पार पडली. जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी, जिल्हा पोलीस अधीक्षक अश्विनी सानप आणि आमदार राजेश पाडवी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत गणेशोत्सवाच्या नियोजनासह विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. धार्मिक उत्सव उत्साहात आणि शांततेत साजरे झाले पाहिजेत. कोणालाही टेन्शन घेण्याची गरज नाही; मात्र उत्सवात शिस्त आणि कायदा-सुव्यवस्था राखणे **(पान ४ वर)**

## साखरेचा नियंत्रित साठा गायब, हेच का अच्छे दिन? शिवसेना महिला आघाडीकडून साखर वाटुन निषेध

**धुळे, दि.२५- देशात साखरेच्या दराने शेअर बाजारातील निर्देशांक पेक्षाही जादा वेगाने उसळी घेतली आहे. नोव्हेंबर महिन्यापासून ऊसाचा गळिप हंगाम सुरू होणार आहे मात्र देशात पुरेल एवढा साखर साठा केंद्र सरकारच्या अन्न व नागरी पुरवठा मंत्रालयाने पुर्वीच नियंत्रित केला असताना**



ागस्ट , सप्टेंबर व ाक्टोंबर या तीन महिन्यांत सरासरी ६५ ते ७० लाख मेट्रीक टन साखरेची खप होणार आहे. याचाच अर्थ देशातील एकुण उत्पादनाच्या २५ ते ३० टक्के साखर या तीन महिन्यात बाजारात विकली जाणार आहे. पुढील तीन महिने अशाच पध्दतीने साखरेचे बाजारभाव वाढत राहिल्यास या खप होणाऱ्या साखरेत मुठभर कारखानदार व व्यापारी मिळून जवळपास २० ते २२ हजार कोटी रूपयाचा नफा कमविला जाणार आहे. याला केंद्र शासनाचे धोरण जबाबदार असून देशातील प्रत्येक साखर कारखान्यात किती साखर साठा शिल्लक आहे याची संपुर्ण आकडेवारी केंद्र सरकारकडे कारखाना निहाय उपलब्ध आहे.

भाजप सरकारमधील सक्रीय राहिलेले देशातील काही मुठभर साखर कारखानदार व साखरेचे व्यापारी यांच्या भल्यासाठी ही सर्व मंडळी **(पान ४ वर)**

### अज्ञात वाहनाची धडक ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू

दोंडाईचा दि. २५(प्रतिनिधी)- खोक्राळे येथून रामी बोरीसकडे जात असताना अज्ञाताच्या वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेत जयसिंग चंद्रसिंग राजपूत (वय ७०) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना अंजनविहरे गावाजवळील एका वळण रस्त्यावर घडली. अंजनविहरेजवळील वळणावर राजपूत यांच्या मोटर सायकलला एका भरधाव अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, राजपूत हे गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी तातडीने राजपूत यांना दोंडाईचा उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. अवनी पाटील यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.

## विमा नाकारणाऱ्या कंपनीला ग्राहक आयोगाचा दणका; पैसे देण्याचे आदेश

**धुळे, दि.२५- विमाधारकाचा मृत्यू आत्महत्या असल्याचे ठोस पुरावे सादर न करता केवळ पोलिसांच्या प्राथमिक नोंदीच्या आधारे विमा दावा नाकारणे ही सेवा त्रुटी व अनुचित व्यापारी प्रथा असल्याचा महत्वपूर्ण निर्णय धुळे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने दिला आहे. आयोगाने तक्रारदार जयश्री प्रविणकुमार चौधरी यांची तक्रार अंशतः मंजूर करून एचडीएफसी.ईआरजीओ जनरल इन्शुरन्स कंपनी लि. या विमा कंपनीला ७ लाख ४९ हजार ३७५ रुपये देण्याचे आदेश दिले आहेत.**



सदर प्रकरणात तक्रारदारांतर्फे अ‍ॅड. दीपक जोशी यांनी अत्यंत प्रभावीपणे युक्तिवाद करत विमा कंपनीने केवळ पोलिसांच्या प्राथमिक नोंदीच्या आधारे विमा दावा नाकारल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. मृत्यू आत्महत्येमुळेच झाला असल्याचे सिद्ध करण्यासाठी विमा कंपनीने आवश्यक व ठोस पुरावे सादर केलेले नाहीत, तसेच केवळ एफआयआर किंवा प्राथमिक तपास नोंदीच्या आधारे विमाधारकाचा मृत्यू आत्महत्या असल्याचे गृहीत धरता येणार नाही, असा ठोस युक्तिवाद अ‍ॅड. जोशी यांनी केला.तसेच, मृत्यू अपघाती असल्याची शक्यता, उपलब्ध कागदपत्रे, विमा करारातील अटी आणि विमा कंपनीची जबाबदारी याबाबत अ‍ॅड. दीपक जोशी यांनी आयोगासमोर कायदेशीर बाजू प्रभावीपणे मांडली. विमा कंपनीने आत्महत्येचा ठोस पुरावा सादर केला नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले. त्यामुळे विमा दावा नाकारणे ही सेवा त्रुटी असल्याचे आयोगाने स्पष्ट केले. आयोगाच्या अध्यक्षा सौ. निता निलेश देसाई व सदस्या सौ. स्नेहलता किशोर पाटील यांच्या खंडपीठाने १७ ऑगस्ट २०२६ रोजी हा आदेश दिला. आदेशानुसार विमा **(पान ४ वर)**



## युवा भारत २०२६ उत्साहात संपन्न हजारो तरुणांचा उत्स्फूर्त सहभाग

**धुळे, दि.२५- युवा भारत, धुळे यांच्या वतीने आयोजित युवा भारत २०२६ हा भव्य कार्यक्रम पी.एस. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, धुळे येथे हजारो तरुणांच्या उत्स्फूर्त सहभागाने मोठ्या जल्लोषात आणि उत्साहात यशस्वीपणे संपन्न झाला.**

कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांच्या हस्ते झाले. उद्घाटनानंतर त्यांनी उपस्थित तरुणांशी संवाद साधत प्रश्नोत्तरांचे सत्र घेतले. यावेळी तरुणाईने करिअर, कौशल्यविकास, स्पर्धात्मक परीक्षा तसेच भविष्यातील संधी यांसंदर्भातील विविध प्रश्न माननीय जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडले. त्यांनी तरुणांच्या प्रश्नांना मार्गदर्शनपर उत्तरे देत त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला.

यावेळी तरुणाईला संदेश देताना भाग्यश्री विसपुते यांनी संयम, जिद्द, चिकाटी आणि शिस्त हे गुण जीवनात अंगीकारण्याचे आवाहन केले. तसेच प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडियाचा वापर करताना विवेक बाळगून त्यापासून सुरक्षित आणि संतुलित अंतर राखण्याचे प्रबोधन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या पुढील सत्रात प्राजक्ता पिंगळे, कौन्सिलर यांनी मनावर विजय मिळवून राष्ट्रनिर्माणात युवा शक्तीची भूमिका या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. आत्मविश्वास, सकारात्मक विचार आणि मानसिक सामर्थ्याच्या माध्यमातून तरुणाई देशाच्या विकासात कशा प्रकारे महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते, याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्र प्रचारक सुमंत आमशेकर यांनी आपला देश, आपले राष्ट्र आणि आपला समाज या भावनेतून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्याची माहिती उपस्थित तरुणांना करून दिली. समाजहित, राष्ट्रसेवा आणि सामाजिक बांधिलकी यांसाठी विविध स्तरांवर करण्यात येणाऱ्या कार्याचा त्यांनी उलगडा केला.

कार्यक्रमात प्रसिद्ध कंटेंट क्रिएटर गौरव **(पान ४ वर)**

## पोषण आहारासाठी अन्न आणि औषध प्रशासनाकडे परवाना काढणे अन्यायकारक- शिक्षक संघाची भूमिका

**धुळे, दि. २५ (प्रतिनिधी) : शासकीय, निमशासकीय आणि अनुदानित शाळांमधील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शालेय पोषण आहारासाठी अन्न आणि औषध प्रशासनाकडे नोंदणी करून परवाना काढण्याची मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समित्यांवर करण्यात येणारी सक्ती अन्यायकारक आणि गैरलागू असल्याची भूमिका धुळे जिल्हा ग्रामीण माध्यमिक शिक्षक संघाने घेतली आहे. यासंदर्भात संघाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन विविध मागण्या मांडल्या आहेत.**

शालेय पोषण आहार शिजवण्यासाठी लागणारे कच्चे अन्नधान्य शासनाकडून पुरविले जाते. शाळा व्यवस्थापन समिती केवळ उपलब्ध करून दिलेले अन्न शिजवून विद्यार्थ्यांना वाटप करण्याचे काम करते. त्यामुळे मुख्याध्यापक अथवा शाळा व्यवस्थापन समिती हे या अन्नाचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष खरेदीदार अथवा पुरवठादार नसल्याने त्यांच्यावर नोंदणी आणि परवाना काढण्याची सक्ती करणे योग्य नसल्याचे शिक्षक संघाने निवेदनात म्हटले आहे. निवेदनानुसार, शाळांचे व्यवस्थापन जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत हाताळले जाते. त्यामुळे औषध प्रशासनाचा परवाना काढण्यासाठी मुख्याध्यापकांवर कोणताही दबाव न टाकता जिल्हा प्रशासनाने प्रशासकीय स्तरावरून संयुक्त परवाना काढून त्याच्या प्रती संबंधित शाळांना उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. मुख्याध्यापक आणि शिक्षक हे कोणत्याही प्रकारचे कंत्राटदार अथवा अन्नपुरवठादार नसल्याचे संघाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे अन्न-औषध प्रशासनाकडे नोंदणीची सक्ती करण्याऐवजी शालेय **(पान ४ वर)**

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,48,100 रु.+3% GST
सोने- 24 K -1,61,000 रु.+3% GST
चांदी- 2,48,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालयात विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा

**शिरपूर, दि.२५- आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय, शिरपूर येथे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावच्या नामविस्तार दिनानिमित्त विशेष कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दिपक बाविस्कर, जे. एल. चौधरी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांचे स्वागत व कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.**

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी ईश्वर बोरसे यांनी प्रास्ताविकातून विद्यापीठाच्या नामविस्तार दिनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट केली. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी आपल्या साहित्यामधून मांडलेली मूल्ये, संस्कार आणि जीवनदृष्टी विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थिनी जयश्री निकुंभे, प्रियांका निकम, चेतना सोनावणे, दीपाली पवार यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रसिद्ध कविता सुमधुर आवाजात सादर करून कार्यक्रमात साहित्यिक रंग भरला. त्यांनी अरे संसार संसार, खोप्यामध्ये खोपा, सुगरणीचा खोपा तसेच धरतीमातेवर आधारित काया काया शेतांमधी घाम जिरव जिरव कवितांचे भावपूर्ण व लयबद्ध सादरीकरण केले. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थित विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त दाद दिली. डॉ. दिपक बाविस्कर यांनी अध्यक्षीय **(पान ४ वर)**

### लाडकी बहीण योजनेसाठी

## महिला व बालकल्याण विभागाकडे सामाजिक न्याय विभागाचे तिनशे चौरेचाळीस कोटी चौथ्यांदा वळविले

**मुंबई, दि. २५ : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना जुलै महिन्याचा हप्ता देण्यासाठी पुन्हा एकदा सामाजिक न्याय विभागाच्या निधीतील मोठी रक्कम महिला व बालविकास विभागाकडे वळवण्यात आली आहे. सामाजिक न्याय विभागाच्या तरतुदीतून ३४४ कोटी ७४ लाख रुपये लाडकी बहीण योजनेसाठी वर्ग करण्यात आले आहेत. यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. यापुर्वी तीनवेळा अशा पध्दतीने निधी वळविण्यात आला होता. त्यावेळी सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांनी नाराजी व्यक्त केली होती. आता पुन्हा तेच घडल्याने मंत्री शिरसाठ यांच्या प्रतिक्रियेकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.**

लाडकी बहीण योजना सुरू झाल्यापासून या योजनेसाठी सामाजिक न्याय विभाग तसेच आदिवासी विकास विभागाच्या निधीचा वापर केल्याचा मुद्दा यापूर्वीही चर्चेत आला होता. इतर विभागांसाठी मंजूर केलेला निधी वारंवार लाडकी बहीण योजनेकडे वळवला जात असल्याने त्या विभागांच्या अन्य योजनांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. उपलब्ध माहितीनुसार, सामाजिक न्याय विभागाच्या निधीतून यापूर्वीही लाडकी बहीण योजनेसाठी तीन वेळा रक्कम वळवण्यात आली आहे. त्यानुसार फेब्रुवारी २०२५ मध्ये जानेवारीच्या हप्त्यासाठी ९८ कोटी ४५ लाख, जून २०२५ मध्ये एप्रिल आणि मे महिन्यांच्या हप्त्यासाठी चारशे दहा कोटी, ऑगस्ट ते ऑक्टोबर २०२५ मध्ये जुलै आणि सप्टेंबरच्या हप्त्यांच्या वितरणासाठी प्रत्येकी चारशे दहा कोटी ३० लाख रुपये वळविण्यात आले होते.

आता पुन्हा ३४४.७७ कोटी रुपये

सामाजिक न्याय विभागाच्या तरतुदीतून महिला व बालविकास विभागाकडे आता पुन्हा ३४४ कोटी ७७ लाख रूपये वर्ग करण्यात आले आहेत. त्यामुळे सामाजिक न्याय विभागाच्या निधीचा लाडकी बहीण योजनेसाठी वापर करण्याची ही चौथी वेळ असल्याचे सांगितले जात आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा आर्थिक भार मोठा असल्याने राज्य सरकारकडून विविध विभागांच्या तरतुदींचा वापर करून योजनेचे हप्ते देण्यात येत असल्याचे चित्र आहे. सामाजिक न्याय विभाग आणि आदिवासी विकास विभागातील निधी वळवला जात असल्याने या विभागांच्या इतर कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विशिष्ट सामाजिक घटकांसाठी आणि विविध कल्याणकारी योजनांसाठी तरतूद केलेला निधी दुसऱ्या योजनेसाठी वळवला जात असल्याने या मुद्द्यावर विरोधकांकडून यापूर्वीही सरकारवर टीका करण्यात आली आहे. आता नव्या निधीवर्गीकरणानंतर पुन्हा राजकीय आरोप-प्रत्यारोप होण्याची शक्यता आहे. दरम्यान, लाडकी बहीण योजनेच्या हप्त्यासाठी इतर विभागांचा निधी वारंवार **(पान ४ वर)**

## पान १ वरुन

## पस्तीस रुपये किलोने कांदा विकणार

केला आहे.केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या प्रति असलेले हे चुकीचे धोरण न बदलल्यास रास्ता रोको सारखे तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे.

सुरुवातीला कांदा कांद्याची अधिक मागणी असणाऱ्या पाच मोठ्या शहरांमध्ये पाठवला जाईल, अशी माहिती आहे. नवी दिल्ली, चेन्नई, मदुराई, एर्नाकुलम अथवा कोची आणि गुवाहाटी या शहरांमध्ये कांदा ३५ रुपये किलोने विकला जाणार आहे. नाशिकमध्ये कांदा एक्स्प्रेसमध्ये कांदा भरण्यात येत असून ही एक्स्प्रेस दिल्लीला जाणार आहे. देशभरात कांद्याच्या दरात वाढ झाल्यानंतर केंद्र सरकारकडून हा निर्णय घेण्यात आला आहे. काल (दि. २४) कांद्याचा दर ४३.५३ रुपये किलो हाता. चेन्नईत कांद्याचा दर ५५ ते ६५ रुपयांवर पोहोचला आहे. कोलकाता येथे कांद्याचा दर ५३ रुपये किलो आहे. ऑगस्ट सप्टेंबर मधील सणांच्या काळात आणि हवामानामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींमुळे कांद्याची दरवाढ रोखण्यासाठी केंद्र सरकार त्यांच्याकडे असलेल्या एक लाख २१ हजार टन बफर स्टॉक कांद्यापैकी काही कांदा बाजारात आणला जात आहे.

## विद्यार्थ्यांचे आंदोलन पेटले

आणि शिक्षण मंत्र्यांशी चर्चा करण्याची मागणी केली आहे. पाटण्यातील गर्दनीबागमध्ये अनेक विद्यार्थी संघटना आंदोलनाला बसल्या आहेत. या आंदोलनाला जवळपास तेरा-चौदा संघटनांचा पाठिंबा मिळाला आहे. मुख्यमंत्र्यांच्या घेराव घालण्याच्या मागणीला आरजेडीकडूनही पाठिंबा मिळाला आहे. पाटण्यात सत्तरावी बिहार लोकसेवा आयोगाची परीक्षा पुन्हा घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून आंदोलन सुरू आहे. त्याचबरोबर उमेदवारांनी नकारात्मक गुणपद्धती रद्द करणे आणि भरती प्रक्रियेत एकच परीक्षा पद्धत लागू करणे, अशा अनेक मागण्या विद्यार्थ्यांच्या आहेत. आंदोलक विद्यार्थ्यांनी गांधी मैदानापासून मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या घराच्या दिशेने मोर्चा काढला.मोर्चामध्ये विद्यार्थ्यांनी आक्रमक भूमिका घेतल्यानंतर प्रशासन आणि पोलिसांनी सुरक्षा व्यवस्था वाढवली होती. आंदोलकांना नियंत्रित करण्यासाठी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला. पोलिस आक्रमक विद्यार्थ्यांना रोखण्याची मागणी करत आहेत. तर आंदोलक विद्यार्थी मागण्यांवर ठाम आहेत. भरती परीक्षेत सुधारणांची गरज असल्याची आंदोलकांची मागणी आहे.

## एकसष्ट लाखांचा गुटखा पकडला

भाई दिवाणजी गामित (वय ३०), दाऊद भाई किलीनभाई गामित (२६), कल्पेशभाई मनुभाई गामित (३२), गुलाब जिभाई बल्लूया गामित (२३, सर्व रा. मिन्नोत, ता. मोंगड, जि. तापी, गुजरात) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. चारही संशयितांना ताब्यात घेण्यात आले. धुळे तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक रविकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी कारवाई केली. संशयितांनी माल कुठून आणला आणि कुणाला पुरवठा करण्यात येत होता, याबाबत तपास सुरू आहे.

## नंदुरबारात पोलीसांचे रूट मार्च

वातावरणात पार पडावा, यासाठी नंदुरबार जिल्हा पोलीस दल सज्ज आहे. शहरातील संवेदनशील भागांवर सीसीटीव्ही कॅमेरे तसेच ड्रोनच्या माध्यमातून पोलिसांकडून लक्ष ठेवण्यात येत आहे.दरम्यान, नागरिकांनी कोणत्याही अफवा अथवा अपप्रचारावर विश्वास ठेवू नये. सोशल मीडियावर धार्मिक भावना दुखावणारी, आक्षेपार्ह किंवा सामाजिक तेढ निर्माण करणारी पोस्ट, फोटो अथवा व्हिडिओ प्रसारित करू नयेत. अशी कोणतीही माहिती निदर्शनास आल्यास ती पुढे प्रसारित न करता तात्काळ पोलिसांच्या निदर्शनास आणून द्यावी, असे आवाहन जिल्हा पोलीस दलाच्या वतीने करण्यात आले आहे.

## कै.मा.न्यायमूर्ती विजयराव कोतवाल..

कोतवाल यांचे समक्ष काम करताना आलेल्या अनुभवांची माहिती दिली. यानंतर मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सारंग कोतवाल साहेब यांच्यापेक्षा मी वयाने सीनियर आहे पण ते मी वकील असताना मुंबई न्यायालयात प्रथम वकील म्हणून प्रॅक्टिस करण्यासाठी आले त्यावेळेस त्यांच्या कामातून ते किती हुशार आहेत याचा अनुभव आला. आज ते माझ्याबरोबरच मुंबई उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून काम पाहत आहेत याचा मला आनंद आहे. उत्तम क्रिकेटपटू व बासरी वादक यातील त्यांच्या गुणांकडे बघतात ते प्रत्येक क्षेत्रामध्ये अत्यंत बारकाईने लक्ष घालतात व आपण त्यामध्ये यशस्वी झालेच पाहिजे या पद्धतीने काम करतात असे म्हणत कोतवाल कुटुंबीयांविषयी गौरव उद्गार काढले.

याप्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणातून बोलताना मा. न्यायमूर्ती प्रसन्ना वराळे साहेब यांनी बाबासाहेब कोतवाल ट्रस्टच्या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. पूर्वी धुळे जिल्ह्यातील त्यांच्या वास्तव्यास असताना स्मरणीय आठवणी त्यांनी आपल्या भाषणातून मांडल्या. प्रख्यात कायदे तज्ञ कै. बाबासाहेब कोतवाल यांचे वडील देखील वकील होते. कै.बाबासाहेब कोतवाल यांनी क्रिकेट मध्ये उत्तम फलंदाजी व गोलंदाजी करून न्यायालयीन कामकाजा बरोबरच क्रीडा क्षेत्रातील आपला रस सर्वांना दाखवून दिला. त्या काळात लॉग टेनीस सुद्धा उत्तम प्रकारे खेळत ही माहिती मिळाल्यावर त्यांचे व्यक्तिमत्व अष्टपैलू होते असेच म्हणावे लागेल. वकील म्हणून त्यांनी चालवलेल्या काही केसेस मला वाचण्याची संधी मिळाली. सिनेतारिका शोभना समर्थ यांच्या विरोधात त्यांचीच मुलगी सिनेतारिका नूतन यांनी केलेली केस मी वाचली.बाबासाहेब कोतवाल शोभना समर्थ यांच्या वतीने लढले व जिंकले देखील, मात्र त्यांना या जिंकण्याचे महत्त्व वाटले नाही. पण त्यांनी प्रयत्नपूर्वक पद्धतीने दोघांनाही समजावत मार्ग कसा निघेल अशा पद्धतीने काम केले आहे, हे माझ्या वाचण्यातून लक्षात आले. आजच्या परिस्थितीत या पद्धतीने काम होणे आवश्यक असल्याचे मला वाटते.मध्यास्तची भूमिका घेणे ही बाब, बाबासाहेब कोतवाल यांच्या काळापासून सुरू झाली असे म्हणावे लागेल.आज न्यायालये, लोक अदालत घेऊन याच भूमिकेतून काम करते आहे, असे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री. प्रसन्ना वराळे साहेब यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सांगितले.

फौजदारी कामातील निष्णात वकील व मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती कै. विजयराव कोतवाल यांच्या अनेक केसेस मध्ये झालेले अनेक निकाल हे आजही न्यायदानासाठी मार्गदर्शक आहेत. मुंबई उच्च न्यायालयाचे मा. न्यायमुर्ति विजयराव कोतवाल यांच्या माध्यमातून कोतवाल परिवाराच्या तिसऱ्या पिढीने देखील तेवढ्याच जोमाने काम केले असून या शहरातील जनतेशी आपली नाळ जुळवून ठेवली होती,हे निश्चित नोंद घेण्यासारखे आहे. आज त्यांच्या नावाने व्याख्यानमाला सुरू करण्यात येत आहे. हा उपक्रम स्वागत करण्यासारखा आहे. सध्याच्या सोशल मीडिया वरून अर्धवट माहितीच्या आधारे किंवा अपूर्ण माहितीच्या आधारे ज्या काही गोष्टी पुरवल्या जातात त्यातून अनेक गैरसमज निर्माण होतात. न्यायालयाने घेतलेल्या निर्णयान संदर्भात किंवा न्यायालयीन कामकाजा संदर्भातील वेगवेगळ्या विषयांवर चर्चा व्याख्यानमालेतून झाल्यास नव्या पिढीतील तसेच इतर वकिलांना चांगले मार्गदर्शन मिळेल,असे मत त्यांनी व्यक्त केले. आपल्या भाषणातून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री.प्रसन्ना वराळे साहेब यांनी साने गुरुजींच्या सांगण्याप्रमाणे विनोबा भावेंनी गीताई लिहून काढली, या धुळे जेलमधील प्रसंगांचा देखील उल्लेख आपल्या भाषणातून केला. कोतवाल कुटुंबाची चौथ्या पिढीचे मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री.सारंग कोतवाल यांच्या कामाचे त्यांनी कौतुक केले. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री.प्रसन्ना वराळे साहेब यांचे भाषण सर्वांना भारवून टाकणारे होते. त्यांनी दिलेली अनेक उदाहरणे मनाला भिडणारी होते.

कार्यक्रमाचे शेवटी अॅड.यतिश गुजराथी यांनी सर्वांचे विस्तृपणे आभार मानले.या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रस्टी सर्वश्री अॅड. देवेंद्रसिह तवर,अॅड.यतिश गुजराथी,अॅड. समीर पंडित,अक्षय छाजेड, डॉ.भूषण चौधरी,हेमंत मदाने आणि कै.बाबासाहेब कोतवाल चॅरिटेबल ट्रस्टच्या माजी विश्वस्तांनी केले. या कार्यक्रमाचे उत्तम सूत्रसंचालन अॅड.सारंगी यतीश गुजराती यांनी केले. कार्यक्रमास धुळे शहरातील वकील वर्ग, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान १ वरुन

## शांतता समितीची बैठक संपन्न

आवश्यक आहे, अशी भूमिका आमदार राजेश पाडवी यांनी मांडली. प्रशासनाला सर्वांनी सहकार्य केले पाहिजे. शांतता समिती केवळ नावापुरती न राहता सदस्यांनी प्रत्यक्ष सहभाग घ्यावा, असे त्यांनी सांगितले.यावर्षी गणेशोत्सवात ड्रोनद्वारे देखरेख व्यवस्था करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. मिरवणूक मार्ग, गर्दीची ठिकाणे आणि संवेदनशील परिसरावर ड्रोनच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येणार आहे. गणेशोत्सव उत्साहात साजरा करताना शांतता, शिस्त आणि सामाजिक सलोखा कायम ठेवावा तसेच प्रशासन व पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन बैठकीत करण्यात आले. बैठकीचे सूत्रसंचालन एलसीबीचे पोलीस निरीक्षक हेमंतकुमार पाटील यांनी केले.

## साखरेचा नियंत्रित साठा गायब

देशात कृत्रिम साखरेचा तुटवडा करून साखरेचे दर वाढवू लागले आहेत. बाजारात कृत्रिम तुटवडा करून स्वतःच्या फायद्यासाठी तेजीत साखर विक्री करून आणि यामुळेच भविष्यात दर नियंत्रणात ठेवण्याच्या नावाखाली साखर आयात करून पुढील हंगामात साखरेचे दर पाडले जाणार असून त्याचा फटका शेतकऱ्यांना बसणार आहे.तीन महिन्या पूर्वी साखरेचा दर प्रति क्विंटल ३८००/- होता आणि आज थेट ७०००/- झाला.. मागील आठ दिवसांपूर्वी ४५००/- चा दर ७०००/- झाला आहे, एकंदरीतच आता स्वयंपाक घरातून साखर गायब होणार असून महिलांना मात्र त्याचा प्रचंड त्रास सहन करावा लागणार असून आज शिवसेना महिला आघाडीच्या वतीने शहरातील विविध पेट्रोल पंपांवर ग्राहकांना साखर वाटून हेच का अच्छे दिन असा प्रश्न उपस्थित करून केंद्र सरकारच्या धोरणाचा निषेध करण्यात आला याप्रसंगी शिवसेना महिला आघाडीच्या धुळे जिल्हा संपर्कप्रमुख अॅड. कीर्ती पांचाळ शार्दुल यांच्या नेतृत्वात प्रभादेवी परदेशी,संगीता जोशी, जयश्री वानखेडे, अरुणा मोरे, सुनीता शिरसाट,ज्योती चौधरी आदींनी या आंदोलनात भाग घेऊन निषेध व्यक्त केला.

## विमा नाकारणाऱ्या कंपनीला..

कंपनीने ४५ दिवसांच्या आत ७ लाख ४९ हजार ३७५ रुपये, तसेच तक्रार दाखल केल्याच्या दिनांकापासून संपूर्ण रक्कम अदा होईपर्यंत दरवर्षी ६ टक्के व्याज देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याशिवाय शारीरिक व मानसिक त्रासापोटी १० हजार रुपये आणि तक्रार खर्चापोटी ५ हजार रुपये देण्याचेही आदेश आयोगाने दिले आहेत.

## युवा भारत २०२६ उत्साहात संपन्न

मालोदे तसेच इंडियन आयडॉल मराठी फेम जगदीश चव्हाण यांनी आपल्या मनोरंजनात्मक सादरीकरणातून व संगीतातून उपस्थित तरुणाईमध्ये उत्साह आणि नवचैतन्य निर्माण केले. त्यांच्या सादरीकरणाला तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला..

## पोषण आहारासाठी अन्न आणि..

परिसर आणि स्वयंपाकगृहाची स्वच्छता राखण्यावर अधिक लक्ष केंद्रित केले जाईल, अशी ग्वाही शिक्षक संघाच्या वतीने देण्यात आली. दरम्यान, या मागणीसंदर्भातील निवेदनाच्या प्रती अन्न आणि औषध प्रशासन आयुक्त, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

# लाडकी बहीण योजनेपासून वंचित महिलांसाठी सेनेचे पं.स.ला साकडे

**शहादा, दि. २४ (का.प्र.)- तालुक्यातील ससदे, बिलाडी, बामखेडा, तीखोरा, पिंगाने यासह विविध ग्रामीण भागातील अनेक महिला शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेपासून अद्याप वंचित आहेत. या महिलांनी शिवसेना नेते व आमदार चंद्रकांत रघुवंशी तसेच शिवसेना जिल्हा प्रमुख रामभैय्या रघुवंशी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन योजनेचा लाभ मिळवून देण्याची मागणी केली होती. यावर आमदार चंद्रकांत रघुवंशी यांनी शहादा तालुका प्रमुखांना वंचित महिलांना तात्काळ लाभ मिळवून देण्यासाठी योग्य ते सहकार्य करण्याचे आदेश दिले.**

आमदार चंद्रकांत रघुवंशी यांच्या सूचनेनुसार, शिवसेना शहादा तालुका प्रमुख मनलेश जायसवाल आणि शहर प्रमुख जितेंद्र जमदाडे यांनी वंचित महिलांसह शहादा पंचायत समिती येथे जाऊन बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांकडे साकडे घातले व महिलांच्या अडचणी मांडल्या.यावेळी पंचायत समितीतील कनिष्ठ प्रशासन अधिकारी रवींद्र कुलकर्णी व मनमोहिनी शिंदे यांनी महिलांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यांनी बाल विकास प्रकल्प अधिकारी सागर चौधरी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली.त्यानंतर श्री.चौधरी यांनी तालुका प्रमुख मनलेश जायसवाल यांच्याशी चर्चा करताना सांगितले की, सर्व वंचित महिलांच्या अर्जांची तात्काळ पडताळणी केली जाईल. ज्या त्रुटींमुळे महिला योजनेपासून वंचित राहिल्या आहेत, त्यांची पूर्तता करून त्यांना लवकरात लवकर योजनेचा लाभ मिळवून दिला जाईल.तालुक्यातील एकही पात्र महिला या योजनेपासून वंचित राहणार नाही, याची पूर्ण दक्षता घेतली जाईल.प्रशासनाला निवेदन दिल्यानंतर तालुका प्रमुख मनलेश जायसवाल यांनी स्पष्ट केले की, जर महिलांना या योजनेचा लाभ लवकरात लवकर मिळाला नाही, तर शिवसेनेच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडले जाईल.या प्रसंगी शिवसेना शहादा शहर प्रमुख जितेंद्र जमदाडे, जयसिंग ठाकरे, अजय सोनवणे, गोपाल कोळी, गणेश ठाकरे, पृथ्वीराज राजपूत, आक्काताई ठाकरे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, शिवसैनिक आणि वंचित महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## पान १ वरुन

## विद्यापीठ नामविस्तार दिन साजरा

मनोगतात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नामविस्ताराची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद केली. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या साहित्याचे महत्त्व स्पष्ट करताना, औपचारिक शिक्षण नसतानाही त्यांच्या प्रतिभेतून निर्माण झालेले साहित्य अत्यंत उच्च दर्जाचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निखिल ठाकरे व नम्रता कोळी यांनी केले. आभार प्रदर्शन विद्यार्थी विकास विभागाचे सहाय्यक अधिकारी डॉ. गजानन खेकाडे यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व विद्यार्थी विकास विभागाने विशेष परिश्रम घेतले. यावेळी डॉ. व्ही. एस. पुराणिक, डॉ. प्रिया कुरकुरे, डॉ. तुषार माळी, डॉ. संतोष कोळी, उषा पाटील, तुषार शिवनेकर तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चौरेचाळीस कोटी चौथ्यांदा वळविले

वळवण्याची आवश्यकता का निर्माण होत आहे आणि त्याचा संबंधित विभागांच्या योजनांवर नेमका काय परिणाम होणार, याकडे आता लक्ष लागले आहे. तसेच सामाजिक न्याय विभागाचे मंत्री संजय शिरसाठ यांनी यापुर्वी नाराजी व्यक्त केली होती. तरी त्यांच्या नाराजीकडे दुर्लक्ष करीत त्यांच्याकडील विभागाचा निधी वळविण्यात आला आहे. त्यामुळे आता मंत्री संजय शिरसाठ काय भुमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## निधन वार्ता

### दिलीप पाटील



धुळे, दि.२४- स्वामीनारायण मंदिर रोड विद्यानगरी कॉलनीतील रहिवासी दिलीप सिताराम पाटील यांचे नुकतेच निधन झाले. मृत्युसमयी ते ६५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून, जावई, नातवंडे व चार भाऊ असा परिवार आहे. देवरे अभियांत्रिकी महाविद्यालयातील कर्मचारी राजेश सिताराम पाटील यांचे ते मोठे बंधू होत.

### सुमन बोरकर



धुळे, दि.२४- माजी शिक्षणाधिकारी श्रीमती सुमन गजानन बोरकर यांचे नुकतेच निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८९ वर्षांच्या होत्या. त्यांना देहदानाचा संकल्प केला असल्याने दि.२३ ऑगस्ट २०२६ रोजी हिरे मेडिकल कॉलेजला देहदान करण्यात आले. त्या देवपूर नेहरू नगरमधील डॉ.सतिश बोरकर यांच्या मातोश्री होत.


WE ARE HIRING

स्टोर मैनेजर



बैंटरी, सोलर व पावर प्रोंडक्ट्सच्या प्रतिष्ठित शोरूमसाठी अनुभवी स्टोर मैंनेजरची आवश्यकता आहे.

अनुभव : किमान 5 वर्ष (सेल्समध्ये) - देवपूर परिसरासाठी

- सेल्स व कस्टमर हँडलिंगचा चांगला अनुभव
- स्टॉक मॅंनेजमेंट व दैनिक कामकाज सांभाळण्याची क्षमता

: Walk-in Interview :
27th August 2026, Time- 10 a.m. TO 2.00 p.m.

TATA POWER SOLAR SOLAR ROOFTOP SOLUTIONS | EXIDE BATTERIES | POWERICA A PROMISE FOR POWER | POWERICA CUMMINS DIESEL GENERATORS

SUPERB™ BATTERIES

Malegaon Road, Opposite Volkswagen Showroom, Dhule.



झाडे लावा झाले जगवा



**पाहिजेत**

शतायुषी या नामांकित प्रॉडक्टच्या मार्केटिंगसाठी सेल्समन पाहिजे गरजूंनी त्वरित संपर्क साधावा.

9372811149
9372985822



**पाहिजेत**

रेडिमेड दुकान कामासाठी काम करणारी सेल्समन मुले लावणे आहे भेटा

-: संपर्क :-

श्रीसत्यनारायण ड्रेसेस

जैन मंदिराजवळ धुळे

9403744965









|| धनदाई माता प्रसन्न || || श्री गणेशाय नमः || || जय जय रघुवीर समर्थ ||

कार्य सिद्धी नेण्यास श्री सद्गुरू समर्थ आहेतच

माजी आमदार स्व.डॉ.रा.भ.चौधरी नगर

सस्नेह निमंत्रण

नामकरण सोहळा

नामकरण सोहळ्याचे अध्यक्ष

श्री.बाबासाहेब राजवर्धन कदमबांडे,माजी आमदार,धुळे शहर

कै.भगवान सुंदर चौधरी

माजी आमदार स्व.डॉ.रा.भ.चौधरी

कै.श्रीमती लक्ष्मीबाई भगवानशेठ चौधरी

प्रमुख पाहुणे: श्री.अमोल पाटणकर, उपसचिव मुख्यमंत्री कार्यालय,मंत्रालय,मुंबई

नामकरण हस्ते: श्री.मदनलालजी मिश्रा सर, अध्यक्ष लोकतंत्र सेनानी संघ धुळे

माजी आमदार स्व.डॉ.रा.भ. चौधरी नगरातील नियोजित विविध प्रकल्प

प्लॉट बुकिंग हफ्त्याने सुरु आहे

चौधरी वेअर हाऊस प्लॉटस | रघुवीर समर्थ कोल्ड स्टोरेज हाऊस | अलकनंदा लॉन्स

नामकरण हस्ते: मा.श्री. विनोदशेठ मित्तल, सुप्रसिद्ध उद्योगपती, धुळे

नामकरण हस्ते: मा.श्री. ओमप्रकाशजी अग्रवाल, ज्येष्ठ राजकीय व सामाजिक नेते, धुळे

नामकरण हस्ते: मा.श्री. सुभाषजी चोथमल अक्षवाल, सुप्रसिद्ध उद्योजक, धुळे

आलेल्या सर्व मान्यवरांचे हार्दिक स्वागत !

मातोश्री लक्ष्मी मंगल कार्यालय — नामकरण हस्ते : श्री. जगन्नाथ सुपडू चौधरी, शिरपूर तेली समाजाचे माजी अध्यक्ष

मातोश्री सरस्वती मंगल कार्यालय — नामकरण हस्ते मा.श्री. प्रकाश घवघवे (नागपूर), गिनीजबुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद असलेलेले ज्येष्ठ संशोधक

विनीत : श्री.रघुनाथ भगवान चौधरी * सौ.अलका रघुनाथ चौधरी * श्री.डॉ.नरेंद्र वामनराव राऊत (पुणे) * सौ. डॉ.संगिता नरेंद्र राऊत * श्री.मनोज रघुनाथ चौधरी * सौ.राजश्री मनोज चौधरी * श्री.मुकेश रघुनाथ चौधरी * सौ.पुनम मुकेश चौधरी * श्री. शुभम सतिषराव सव्वालाखे (अमरावती) * सौ.रश्मी शुभम सव्वालाखे * चि. आर्यन * साक्षी * क्षितिज * सिद्धी * समर्थ * त्रिनय

रविवार दि ३० ऑगस्ट २०२६
वेळ : सकाळी १० वा.
भोजन दुपारी १२.३०ते ३.३० पर्यंत

नामकरण सोहळ्याचे स्थळ : माजी आमदार स्व.डॉ.रा.भ.चौधरी नगर ,पारोळा रोड, हॉटेल शितल च्या मागे, धुळे.



**त्वरीत पाहिजेत**

दुकानात कामासाठी पूर्णवेळ

लेडिज-२

मुले-२

-: संपर्क :-

9423191694



**शेती विकणे आहे**

मौजे धुळे ता.जि. धुळे येथील स. नं. ५३१/क भोगवट वर्ग -१ क्षेत्र ० हे. २२ आर. ही मिळकत मदरसा सिराजुल उलुम धुळेची आहे. सदर शेती विकणे आहे.

-: माहितीसाठी संपर्क :-

हाजी इफतेखार अहमद मुन्ना शेठ 8625029286

बिलाल अहमद अन्सारी 9420440008



**प्लॉट विकणे आहे**

रामचंद्र नगर काँक्रीट रोडटच प्लॉट विकणे आहे. कॉटन मार्केटच्या पुढे, रामचंद्र नगरमध्ये ६० फुटी कॉंक्रीट रोडला लागून ४३०० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे.

-:संपर्क :-

डी आर प्रॉपर्टीज 9422289693



**प्लॉट विकणे**

अग्रवाल नगरमध्ये २००० स्क्वेअर फुटाचा प्लॉट विकणे आहे.

-:संपर्क :-

डी आर प्रॉपर्टीज 9422289693.



**३ बीएचके बंगला भाड्याने देणे**

मालेगांव रोड लगत, महावीर सोसायटी जवळ, तीन बेडरुम, हॉल, डायनिंग, किचन, स्टोअर रुम फर्निचरसह गार्डन कंपाउंड पार्किंग सह बंगला भाड्याने देणे आहे.

-:संपर्क :-

डी आर प्रॉपर्टीज 9422289693



**घर भाड्याने देणे**

सर्व सोयींयुक्त तीन रुम भाड्याने देणे आहे.

-:संपर्क :-

६९ शिवप्रताप कॉलनी, नकाने रोड देवपूर, धुळे.

9422792512
777585524



**अजळकरनगर रो हाऊस विकणे**

सुरत बायपास जवळ अजळकर नगरमध्ये दोन मजली रोहाऊस घर फर्निचरसह विकणे आहे.

-:संपर्क :-

डी आर प्रॉपर्टीज 9422289693



**पाहिजेत**

सोना लेडीज वेअर किड्स वेअर पारोळा रोड, धुळे कपडे की दुकान के लिए

२ - सेल्समन

२ - हेल्पर

चाहिये

9767544005



Godrej

27 वर्षांपासून गोदरेज कंपनीचे ऐकमेव अधिकृत डिलर .



आजच खरेदी करा गोदरेजचे प्रॉडक्ट आणि मिळवा भव्य रोख सुट

BAJAJ FINSERV

0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.

फायनान्सला लागणारी कागदपत्रे: 1) पॅनकार्ड 2) आधार कार्ड 3) बँक पासबुक व चेक

नियम व अटी लागू*

ak media- 238222

59 वर्षापासून आपल्या सेवेत...

अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.

श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०